**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - वेतन - २०१९/अशा.महा./०९/वेतनपथक, पुणे दिनांक - ११ नोव्हेंबर, २०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,
विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

२. कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे

**विषय - वेतन अनुदान माहे नोव्हेंबर, २०१९.**

सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील माहे नोव्हेंबर, २०१९ चे वेतन अनुदानाचे एचटीई सेवार्थ प्रणालीमधील मधील देयक आणि विवरणपत्र १ ते ७ मधील माहिती तयार करुन सदरहू माहिती याच कार्यालयात खाली नमूद केलेल्या दिनांकास व वेळेत सादर करावी.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | १४ नोव्हेंबर, २०१९ | सकाळी १०.३० ते दुपारी २.०० पर्यंत |
| २ | पुणे जिल्हा | १५ नोव्हेंबर, २०१९ | |
| ३ | अकृषी व अभिमत विद्यापीठे | १५ नोव्हेंबर, २०१९ | |
| ४ | अहमदनगर | १६ नोव्हेंबर, २०१९ | |
| ५ | नाशिक | १८ नोव्हेंबर, २०१९ | |

**तसेच ज्या कर्मचा-यांचा समावेश अजूनही एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये करण्यात आलेला नाही त्या कर्मचा-यांचेदेखील वेतनपत्रक स्वतंत्ररित्या सादर करावे.**

माहे नोव्हेंबर, २०१९ चे वेतन देयक सादर करतांना अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजनेसाठी (डी.सी. पी. एस.) कर्मचा-यांची ऑक्टोबर, २००७ या महिन्याची कपात करावयाची असून त्यासाठी **महागाई भत्त्याचे ०९ टक्के दराने परिगणन करावे.**

माहे नोव्हेंबर, २०१९ चे वेतन देयक सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणा-या कर्मचा-यांचे बाबतीत महागाई भत्त्याच्या १५४ टक्के दराने आणि सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणा-या कर्मचा-यांचे बाबतीत महागाई भत्त्याच्या १२ टक्के दराने परिगणित करण्यात यावे.

शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ०८ जुलै, २०१९ अन्वये सातव्या वेतन आयोगामध्ये वेतन घेणा-या कर्मचा-यांच्या महागाई भत्त्याच्या दरामध्ये सुधारणा करण्यात आलेली असून सदरहू आदेश माहे जुलै, २०१९ पासून लागू करण्यात आलेले आहेत. त्यामुळे दिनांक ०१ जुलै, २०१९ ते ३१ ऑक्टोबर, २०१९ या कालावधीतील शिक्षक कर्मचा-यांना देय असलेली थकित महागाई भत्त्याची रक्कम माहे नोव्हेंबर, २०१९ चे वेतन देयकामध्ये समाविष्ट करुन माहे नोव्हेंबर, २०१९ चे वेतन देयक तयार करुन सादर करावे. तसेच उपरोक्त कालावधीमध्ये जे शिक्षक कर्मचारी सेवानिवृत्त/ मयत/स्वच्छासेवानिवृत्ती/राजीनामा/नोकरी सोडून गेलेले आहेत त्यांचे महागाई भत्त्याची रक्कमेचे परिगणन यापूर्वी या कार्यालयाचे पत्र क्रमांक म.भ. - २०१९/(४४९९/१९)/वेतनपथक, पुणे दिनांक ११ ऑक्टोबर, २०१९ मध्ये नमूद केलेल्या विवरणपत्रामध्ये वेतन देयकासोबत सादर करण्यात यावे. तसचे जे कर्मचारी डी सी पी एस योजनेमध्ये आहेत त्यांची डी सी पी एस डी ए ॲरिअर्स या टॅब मधून १० टक्के अंशदान कपात करण्यात यावी.

**जे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी माहे जानेवारी, २०२० मध्ये सेवानिवृत्त होणार आहे त्यांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणीची रक्कम कपात करण्यात येऊ नये.**

उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेऊन माहे नोव्हेंबर, २०१९ च्या वेतन देयकासाठीची एचटीई सेवार्थ प्रणालीमधील **Outer** ची प्रत आणि फक्त **०६, ०७** या विवरणपत्राची माहिती Microsoft Excel मध्ये Times New Roman या फॉन्टमध्ये विवरणपत्रे तसेच माहे ऑक्टोबर, २०१९ चे वेतनापेक्षा माहे नोव्हेंबर, २०१९ चे वेतनामध्ये बदल झालेले असल्यास वेतननिश्चितीचे आदेश तसेच बदली आदेश आणि रुजू आदेश याची माहिती सादर करण्यात यावी. तसेच **वेतन देयकासोबत खालील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.**

**उपयोगिता प्रमाणपत्र**

**प्रमाणित करण्यात येते की खाली नमूद केलेली माहिती अचूक असून त्याची खात्री मी स्वतः यासाठीच्या आवश्यक असणा-या सर्व नोंदवहया तपासून करुन घेतली आहे. यामध्ये काही चुक आढळल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालयाची राहील.**

| अ. क्र. | महिना | तपशील | सहसंचालक पुणे यांचेकडून बँक ऑफ महाराष्ट्रच्या वेतन खात्यामध्ये जमा केलेली रक्कम | प्रत्यक्ष वितरीत रक्कम | शिल्लक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | | | | | | |
| ०२ | | | | | | |
| | | **एकूण** | | | | |

तरी उपरोक्त बाबी विचारात घेऊन वर नमूद केलेल्या तारखांना आपण आपले महाविद्यालय/अकृषी आणि अभिमत विद्यापीठाचे माहे नोव्हेंबर, २०१९ चे वेतन देयक न चुकता सादर करावे.

**सही/-**
(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे